# चंद्रभागा नदीचे पावित्र्य व स्वच्छतेकडे लक्ष देण्याची गरज : घळसासी

- पाल्यांना जातीभेद, वर्णभेद यापासून दूर ठेवावे
- कलासाधना मंडळाच्यावतीने सुरु असलेले कार्य प्रेरणादायी



**तभा वृत्तसेवा**
**पंढरपूर,दि.१७ फेब्रुवारी-**

श्रीक्षेत्र पंढरपूर येथील चंद्रभागा नदीचे पावित्र्य व स्वच्छतेकडे लक्ष देण्याची नितांत गरज आहे. पालकांनी आपल्या पाल्यांना जातीभेद, वर्णभेद यापासून दूर ठेवावे. लहानपणापासूनच त्यांच्या मनात राष्ट्रभक्ती रुजविण्याकामी विशेष लक्ष द्यावे, असे प्रतिपादन ज्येष्ठ निरुपणकार विवेक घळसासी यांनी केले.

येथील कलासाधना सांस्कृतिक मंडळाच्यावतीने ज्येष्ठ निरुपणकार विवेक घळसासी यांना 'पंढरी कलारत्न' पुरस्काराने गौरविण्यात आले. या गौरवादाखल उत्तर देताना ते बोलत होते. पंढरपूर येथील कर्मयोगी सभागृह येथे आयोजित केलेल्या या कार्यक्रमास माजी आमदार प्रशांत परिचारक, पंचागकर्ते मोहन दाते यांची प्रमुख उपस्थिती होती.

ज्येष्ठ निरुपणकार विवेक घळसासी पुढे म्हणाले, कलासाधना सांस्कृतिक मंडळाच्या वतीने देण्यात आलेला पुरस्कार म्हणजे आपल्या मातीतील आयुष्य सुगंधीत करणारा सर्वोच्च पुरस्कार होय. 'कलासाधना'कडून सुरु असलेले कार्य इतरांना प्रेरणादायी ठरणारी आहे. कलासाधना मंडळाने आपले कार्य अखंडपणे सुरु ठेवावे. दक्षिण काशी म्हणून सर्वदूर परिचित असलेल्या श्रीक्षेत्र पंढरपूरला कलेचा देखील दैदिप्यमान वारसा लाभलेला आहे. अनेक शतकांची ही पुण्यभूमी संतांच्या पदस्पर्शाने पावन झालेली आहे. साहित्य, कला, संगीत व नाट्य या विविध क्षेत्रात अनेक दिग्गज कलाकारांनी आपली कलासाधना जोपासली आहे, असेही ते म्हणाले. माजी आमदार प्रशांत परिचारक म्हणाले, माजी आमदार कै. सुधाकरपंत परिचारक यांचा आशीर्वाद असल्याने ह्या संस्थेचे कार्य अव्याहत सुरु आहे. भविष्यकाळातही संस्थेच्या पाठीशी आपण खंबीरपणे उभा राहणार आहे. दरम्यान, शाहीर विजय व्यवहारे यांनी घळसासी यांच्या आयुष्यावर आधारित पोवाडा सादर केले.

'कलासाधना'च्या वतीने घेण्यात आलेल्या विविध स्पर्धांचे परीक्षण वा.गो. भाळवणकर, जान्हवी पुजारी-दुदगीकर, अंकिता हावगोळ-राजे, सारिका कोठाडिया, आरती मनमाडकर, प्रतिभा यादव, स्नेहल पाठक-देशपांडे, राजेश खिस्ते, संजय बडवे, प्रद्युम्न कमठाणकर, राजेश अंबिके, गजानन सावंत, संतोष कुलकर्णी यांनी केले. कलासाधना सांस्कृतिक मंडळाचे संस्थापक अध्यक्ष श्रीकांत प्रभाकर बडवे महाजन यांनी प्रास्ताविक केले. ज्ञानेश्वर मोरे यांनी पाहुण्यांचा परिचय करुन दिला. अक्षय बडवे यांनी उपस्थितांचे स्वागत केले. डॉ.मैत्रेयी केसकर यांनी सूत्रसंचालन केले. रणजीत पवार यांनी आभार मानले.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्रा.विनायक परिचारक, अमरसिंह चव्हाण, राजेंद्र माळी, डॉ.कैलाश करांडे, अरिहंत कोठाडिया, डॉ.किरण बहिरवाडे, अभिराज बडवे, प्रा.राजेंद्र मोरे, राजकुमार शहा, राजकुमार आटकळे, बसवराज बिराजदार, प्रा.मंदार परिचारक, महेश अंबिके, डॉ.बसवराज सुतार, डॉ.आनंद भिंगे, अमृतभाई शहा, अनंता नाईकनवरे, अशोक आवताडे, महेश देशपांडे, नारायण बडवे, मंदाकिनी देशपांडे, प्रतिभा यादव, प्रद्युम्न कमठाणकर, शिवाजी यादव आदींनी परिश्रम घेतले.

**यांचाही झाला सन्मान :** महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत घेण्यात आलेल्या परीक्षेमध्ये यश प्राप्त करुन सहाय्यक महसूल यापदी निवड झाल्याबद्दल सोनिया शरद कागदे, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या भूगर्भशास्त्र विषयात सुवर्णपदक प्राप्त केल्याबद्दल प्रतीक्षा भारत माळी, दिल्ली कॅपिटल्स संघाच्या टीम डॉक्टर व मुंबई क्रिकेट असोसिएशनच्या वरिष्ठ महिला संभाव्य संघात खेळाडू म्हणून निवड झाल्याबद्दल वेदिका चंद्रकांत मगर, महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशनच्या १९ वर्षाखालील मुलींच्या टी २० व वनडे संघात निवड झाल्याबद्दल भक्ती गणेश पवार, राष्ट्रीय पातळीवर स्वच्छ व निरोगी भारत याविषयी माझ्या पाच कल्पना या शोध निबंधास राष्ट्रपती पारितोषिक मिळाल्याबद्दल संस्कार अशोक आवताडे, घनकचरा व्यवस्थापन या शोध निबंधास राष्ट्रपती पारितोषिक मिळाल्याबद्दल सार्थक सिध्देश्वर लेंगरे यांच्यासह प्रा.व्ही.डी. परिचारक, डॉ.कैलाश करांडे, राजेंद्र माळी, अमरसिंह चव्हाण, अनिरुध्द बडवे-पाटील.

# विडी कारखान्याला आग; दुचाकी जळून खाक

कोणतीही जिवितहानी झाली नाही



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१७ फेब्रुवारी-**

पद्मशाली चौक येथे असलेल्या देसाई विडी कारखाना क्रमांक ५ आणि ११ मध्ये मंगळवार, दि.१७ फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी ७ वाजण्याच्या सुमारास आग लागल्याची घटना घडली. यात दोन दुचाकी जळून खाक झाल्या आहेत. यात कोणतीही जिवितहानी झाली नाही.

ही घटना कळताच बघ्यांनी एकच गर्दी केली होती. विद्युत वायरीमध्ये शॉर्टसर्किट झाल्याने ही आग लागली. आगीचे लोण परिसरातील दोन दुचाकीपर्यंत पोहोचल्याने त्या दुचाकी जळून खाक झाल्या. आगीची वार्ता येतात अग्निशामक दलाच्या जवानांनी तातडीने तिकडे धाव घेतली. कारखान्याच्या दुसऱ्या मजल्यावर एक कुटुंब वास्तव्यास असून त्यांना सुरक्षित स्थळी हलविण्यात आले. देसाई कारखान्याचे व्यवस्थापक पटेल आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली. या आगीत कारखान्याचे काही किरकोळ नुकसान झाले आहे. स्कूटरला आग लागल्यानंतर फटाक्यांसारखे आवाज येत होते, अशी प्रत्यक्षदर्शींकडून सांगण्यात आले. जेलरोड पोलिस ठाण्याची या घटनेची नोंद करण्यात आली.

## धनादेश प्रकरणी आरोपीस कारावास

**सोलापूर :** एका फायनान्सला दिलेला धनादेश न वटल्याबद्दल एका आरोपीस प्रथम वर्ग न्यायाधीश विनायक रेडेकर यांनी १ वर्षाचा कारावास, धनादेश रकमेच्या दुप्पट दंड ठोठावला. आनंद शिवणगी असे त्या आरोपीचे नाव आहे, अशी माहिती ॲड.सुरेश बिराजदार यांनी पत्रपरिषदेत दिली. यावेळी फायनान्सचे संचालक गणेश चवटे, विजय चवटे उपस्थित होते. यातील आरोपी आनंद शिवणगी याने विजय फायनान्सला दिलेला धनादेश वटला नव्हता. याप्रकरणी आरोपीस ६ महिने अधिकचा कारावास, रक्कमेवर दसादशे ९ टक्के व्याज अशी शिक्षा सुनावण्यात आली.

# भ्रष्टाचार प्रतिबंधक कायद्याविषयीची दिली माहिती

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१७ फेब्रुवारी-**

बार असोसिएशनच्या सोलापूर शाखेच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या व्याख्यानमाला अंतर्गत वकिलांना भ्रष्टाचार प्रतिबंधक कायद्यातील विविध कलमांची माहिती देण्यात आली. वकील मंडळींना नवनवीन कायद्याची माहिती उपलब्ध करुन देणे या अनुषंगाने बार असोसिएशनच्या वतीने व्याख्यानमाला हा उपक्रम हाती घेण्यात आला असून यंदाचे १३ वे व्याख्यान होते.

ॲड.अश्विनी कुलकर्णी यांनी भ्रष्टाचार प्रतिबंधक कायद्यातील कलमे, तपास यंत्रणा, न्यायालयीन प्रक्रिया, पुराव्यांचे स्वरुप, सर्वोच्च व उच्च न्यायालयीन महत्त्वपूर्ण निर्णय आदींविषयी मार्गदर्शन केले. बार असोसिएशनचे



अध्यक्ष ॲड.बाबासाहेब जाधव, ॲड.मीरा प्रसाद यांच्या हस्ते वक्त्यांचा सत्कार करण्यात आला. ॲड.अरविंद देडे यांनी वक्त्यांचा परिचय करुन दिला.

ॲड.बसवराज हिंगमिरे यांनी सूत्रसंचालन केले. ॲड.मीरा प्रसाद यांनी आभार मानले. याप्रसंगी ॲड.विजय शिंदे, ॲड.विनोदकुमार दरगड, ॲड.संजय गायकवाड, ॲड.मल्लिनाथ पाटील, ॲड.रोहिदास पवार, ॲड.परवेज ढालयात, ॲड.नागनाथ बिराजदार, ॲड.मनोज पामुल, ॲड.बसवराज बेरड, ॲड.निदा सैफन आदी उपस्थित होते.



# 'डीपीसी'च्या सदस्यांची नियुक्ती कधी?

- ४० जागा : इच्छुकांची उत्सुकता शिगेला

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१७ फेब्रुवारी-**

जिल्हा परिषद, पंचायत समिती, महापालिका आणि नगरपालिका निवडणुका पार पडल्याने आता डीपीसी अर्थात जिल्हा नियोजन समिती सदस्य नियुक्तीचा मार्ग मोकळा झाला आहे. पालकमंत्री जयकुमार गोरे यांची नियुक्ती होऊन वर्ष उलटून गेले तरी डीपीसीवरील निमंत्रित सदस्यांची नियुक्ती अद्याप झालेली नाही. त्यामुळे रखडलेल्या 'डीपीसी'च्या सदस्यांची नियुक्ती कधी होणार? याकडे लक्ष लागून राहिले आहे. डीपीसीच्या एकूण ४० जागा असून या समितीवर काम करण्यासाठी इच्छुक असलेल्यांची उत्सुकता शिगेला पोहोचली असल्याचे दिसून येते.

जिल्ह्याच्या सर्वांगीण आणि रचनात्मक विकासासाठी जिल्हा नियोजन समिती ही महत्त्वाची यंत्रणा मानली जाते. विविध स्थानिक स्वराज्य संस्थांकडून येणाऱ्या विकास आराखड्यांचे समन्वयन, निधीचे नियोजन आणि कामांच्या प्राधान्यक्रमाचा निर्णय या समितीमार्फत घेतला जातो. शासनाच्या आदेशानुसार जिल्हा परिषदेतून २७ आणि महापालिका व नगरपालिका क्षेत्रातून १३ अशा ४० सदस्यांची निवड प्रत्यक्ष निवडणुकीद्वारे करायची असते.

हे ४० सदस्यच समितीतील निर्णयप्रक्रियेत मतदानाचा अधिकार असलेले अधिकृत सदस्य असतात. १९९९ मध्ये शासनाने नियोजन समितीची पुनर्रचना करत स्पष्ट नियमावली निश्चित केली. त्यानुसार पालकमंत्री हे समितीचे अध्यक्ष तर जिल्हाधिकारी सदस्य सचिव म्हणून काम पाहतात. खासदार, आमदार यांना विशेष निमंत्रित सदस्य म्हणून स्थान दिले जाते. नियोजन विषयाचे ज्ञान असलेल्या ११ अशासकीय सदस्यांची नियुक्ती पालकमंत्र्यांच्या शिफारसीवरुन केली जाते. अशा प्रकारे समितीत एकूण १५ निमंत्रित सदस्यांचा समावेश असतो.

समितीच्या बैठकीत सर्व सदस्यांना विकासकामांवर चर्चा करण्याचा, निधीच्या खर्चावर सूचना मांडण्याचा आणि विविध विषयांवर आपली मते नोंदवण्याचा अधिकार आहे. मात्र निर्णायक क्षणी, एखाद्या प्रस्तावाला मंजुरी देताना किंवा निर्णय घेताना मतदानाचा अधिकार फक्त निवडून आलेल्या ४० सदस्यांनाच असतो. जर एखाद्या विषयावर मते समसमान झाली, तर अध्यक्ष म्हणून पालकमंत्र्यांचे मत अंतिम ठरते आणि त्यानुसार निर्णय मंजूर केला जातो.

सध्या जिल्ह्यातील अनेक माजी आमदार, विविध स्थानिक स्वराज्य संस्थांतील पदाधिकारी आणि राजकीय क्षेत्रातील इच्छुक डिपीसी सदस्यपदासाठी प्रयत्नशील आहेत. नवीन सदस्यांची नियुक्ती झाल्यास जिल्ह्यातील प्रलंबित विकासकामांना गती मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

# भरतनाट्यम् व तेलुगु कवींच्या कविता रंगल्या

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१७ फेब्रुवारी-**

महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक कार्य विभागाच्या महाराष्ट्र राज्य तेलुगु साहित्य अकादमीच्या वतीने आयोजित केलेल्या नटराज नृत्य संगीत विद्यालयाचे भरतनाट्यम व तेलुगु कवींच्या कविता वाचन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात भरतनाट्यम् व तेलुगु कवींच्या कविता उत्तरोत्तर रंगतदार ठरत गेल्या.




प्रारंभी सहसंचालक सचिन निंबाळकर, डॉ.माणिक गुर्रम, हरीश इरनाक, जगनबाबू गंजी, जनार्दन अंबाल, कल्पना अर्शनपल्ली, वासुदेव आडकी, मल्लिकार्जुन कमटम, बालराज बोल्ली, तिपण्णा गणेरी, प्रभाकर भीमनाथ, रघुनाथ गड्डम यांच्या हस्ते नटराज पूजन व दीपप्रज्वलन करण्यात आले.

नटराज नृत्य संगीत विद्यालयाच्या विद्यार्थिनींनी एकदंताय विघ्नहे, बोनाला पंडुगा, भरत वेदम, ओम जयंती मंगला, पदचलनम शिवस्तुती, बतुकम्मा, संक्रांती पंडुगा, अर्धनारीईश्वर स्तोत्रम इत्यादी भरतनाट्यम नृत्य सादर करत उपस्थितांची मने जिंकली. रघुनाथ गड्डम, लतिका बल्ला, मोनिका द्यावनपल्ली यांचे मार्गदर्शन लाभले. रेणुका बुधाराम यांनी मन तेलुगु भाषा, ओगन्ना देवनपल्ली यांनी छत्रपती शिवाजी राजा, प्रा.नरेंद्र गुंडेली यांनी महाशिवरात्री, बालाजी गोप यांनी मंची मनसुलू, डॉ.प्रियांका महिंद्रकर यांनी निस्नेहम, रचना बोल्लू यांनी तेनकयीना तीयनदी, बबलू चिंता यांनी कलियुगम, दत्तात्रय कडवेरी यांनी हरिहरा, राधा यरझल यांनी वृक्षो रक्षति रक्षितः तर रामचंद्र श्रीराम यांनी प्रभू नीवू ऐकडा उनावू या तेलुगु कविता सादर करुन रसिकांना मंत्रमुग्ध केले. अशोक कंटे यांनी सूत्रसंचालन केले.

यावेळी पद्मशाली ज्ञाती संस्थेचे विश्वस्त रामचंद्र जन्नू, नगरसेवक सत्यनारायण गुर्रम, माजी नगरसेविका विजया वड्डेपल्ली, अंबादास बिंगी, गोपीकृष्ण वड्डेपल्ली, किसन आडम, सत्यनारायण गुंडेली, पुरुषोत्तम बुधारम, नरेंद्र दारा, रामनारायण विडप, श्रीनिवास पेरला, भास्कर कोडम, अशोक उडता, शिरीष उजनकर, संभाजी बचुटे, प्रभाकर चिप्पा, श्रीनिवास मद्राल, सुरेश निकंबे, चंद्रप्रकाश यनगुंडी, रामकृष्ण अघोर, जावेद शेख आदी उपस्थित होते.

# छत्रपती शिवाजी महाराज जयंतीनिमित्त उद्या पदयात्रा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १६ फेब्रुवारी**



छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त प्रशासनाच्या वतीने गुरुवार, दि.१९ फेब्रुवारी २०२६ रोजी पदयात्रेचे आयोजन करण्यात आले आहे. पार्क चौक येथून सकाळी ७.३० वाजता या पदयात्रेस प्रारंभ करण्यात येणार आहे, असे प्रभारी जिल्हाधिकारी तथा अप्पर जिल्हाधिकारी गणेश निऱ्हाळी यांनी सांगितले. दरम्यान, या पदयात्रेच्या अनुषंगाने सर्व विभागांनी नेमून दिलेल्या जबाबदाऱ्या काटेकोरपणे पार पाडाव्यात आणि क्रीडा विभागाने सर्वांशी समन्वय साधावा, अशा सूचनाही त्यांनी दिल्या.

या पदयात्रेसंदर्भात शासन व विभागीय आयुक्त यांच्या सूचनेनुसार जिल्हाधिकारी कार्यालयात विभागप्रमुखांची बैठक घेण्यात आली. निवासी उपजिल्हाधिकारी अभिजीत पाटील, प्रांताधिकारी सदाशिव पडदुणे, सहाय्यक आयुक्त (मनपा) मनीषा मगर, सहाय्यक पोलिस निरीक्षक तुकाराम घाडगे, उपशिक्षणाधिकारी प्रकाश नांगरे, कौशल्य विकास विभागाच्या सहाय्यक आयुक्त संगीता खंदारे, तालुका क्रीडाधिकारी राहुल गायकवाड, प्रशासनाधिकारी मल्हारी माने आदी उपस्थित होते.

ही पदयात्रा तरुण पिढीला छत्रपती शिवाजी महाराज यांच्या विचारांशी जोडणारी, राष्ट्रप्रेम जागृत करणारी आणि स्वराज्याचा संदेश देणारी प्रेरणादायी ठरावी, पोलिस विभागाने वाहतूक व्यवस्थापनाची योग्य काळजी घ्यावी, क्रीडा व शिक्षण विभागाने शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थी तसेच खेळाडूंचा जास्तीत जास्त सहभाग सुनिश्चित करावा. महानगरपालिकेमार्फत पिण्याचे पाणी, आरोग्य सुविधा, रुग्णवाहिका, डॉक्टर व ग्लुकोज पाकिटांची व्यवस्था करण्यात येणार आहे, असेही सांगितले.

# विकासाच्या मुद्द्यांना खो; 'डीपीसी'त आरोप-प्रत्यारोपांच्या झाडल्या फैरी

## जिल्हा नियोजन समिती बैठकीचा ठोस निष्कर्ष कुठे?

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१७ फेब्रुवारी**

सोलापूर जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासासाठी महत्त्वाची मानली जाणारी डीपीसी अर्थात जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीत विकासाच्या मुद्द्यांना जणू खो घालण्यात आला. आरोप-प्रत्यारोपांच्या फैरी झाडण्यात आल्याने ही बैठक वादळी ठरली. विकासकामांचा पाया रचणे, निधीचे योग्य नियोजन करणे, प्रलंबित प्रश्न सोडविणे याअनुषंगाने 'डीपीसी'ची बैठक महत्वाची मानली जाते. मात्र मागील काही वर्षांपासून त्याच त्या विषयांवर चर्चा, तीच ती आश्वासने, ठोस निर्णयांचा अभाव असे चित्र



दिसून येत आहे.

लोकप्रतिनिधी सभागृहात नागरिकांच्या समस्या मांडतात, विविध विभागांच्या कामकाजावर प्रश्न उपस्थित करतात; परंतु शासकीय यंत्रणांकडून अपेक्षित ती कार्यवाही होत नसल्याची नाराजीही वारंवार व्यक्त होते. परिणामी बैठकीत मांडले जाणारे प्रश्न प्रत्यक्षात कितपत मार्गी लागतात? हा गंभीर व चिंतनाचा विषय बनला आहे. शेतीसाठी दररोज किमान आठ तास अखंड आणि पूर्ण क्षमतेने वीजपुरवठा व्हावा, अशी शासनाची स्पष्ट तरतूद आहे. मात्र प्रत्यक्षात चित्र वेगळेच असल्याचा आरोप आमदारांनी केला.

विद्युत रोहित्रांवर अतिरिक्त भार पडत असल्याने आठ तासांच्या कालावधीतही अनेकदा वीजपुरवठा खंडित होतो. परिणामी शेतकऱ्यांना पिकांना पाणी देणे अशक्य होते. वीजपुरवठ्याच्या या लपंडावामुळे शेती व्यवस्थापनाचा पूर्ण ताळमेळ बिघडत असल्याचे सांगण्यात आले. ठराविक वेळेत मोटार सुरु करुन सिंचन करणे शक्य नसल्याने पिकांचे नुकसान होत आहे. विशेषतः उन्हाळी हंगामात ही समस्या अधिक तीव्र होते. यासंदर्भात संबंधित विभागाकडून ठोस उपाययोजना काय? याबाबत स्पष्ट उत्तर मिळाले नसल्याने नाराजी व्यक्त करण्यात आली.

### दुग्ध व्यवसायावर परिणाम

सोलापूर जिल्हा शेतीबरोबरच दुग्ध व्यवसायासाठीही ओळखला जातो. आधुनिक पध्दतीने दूध काढण्यासाठी यंत्रसामग्री उपलब्ध झाली असली तरी ती चालवण्यासाठी अखंड वीज आवश्यक असते. सकाळी ६ ते ९ आणि सायंकाळी ५ ते ८ यावेळेत दूध काढणे व जनावरांसाठी वैरण तयार करणे अशी कामे सुरु असतात. परंतु याच वेळेत वीजपुरवठा खंडित होत असल्याची तक्रार बैठकीत मांडण्यात आली.

### अतिवृष्टी नुकसान, पंचनाम्यांवरील आरोप

ऑगस्ट ते सप्टेंबर महिन्यात झालेल्या अतिवृष्टी आणि महापुरामुळे जिल्ह्यातील अनेक भागांतील पिकांचे मोठे नुकसान झाले. यानंतर पंचनामे करून नुकसान भरपाई देण्याची प्रक्रिया सुरु झाली. मात्र काही तलाठी पंचनाम्यासाठी पैसे मागत असल्याचा गंभीर आरोप सभागृहातच आमदारांनी केला. ही बाब अत्यंत संवेदनशील असून प्रशासनाच्या विश्वासार्हतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित करणारी आहे.

### बैठका होतात, चर्चा होते पण...

सोलापूर जिल्ह्याच्या सर्व भागांचा संतुलित विकास व्हावा, निधी योग्य ठिकाणी खर्च व्हावा आणि शेतकरी, दुग्ध उत्पादक तसेच सामान्य नागरिकांच्या अडचणींना न्याय मिळावा, यासाठी समितीच्या बैठकीत केवळ आरोप-प्रत्यारोप न होता ठोस निर्णय आणि वेळबध्द अंमलबजावणी होणे आवश्यक आहे. अन्यथा 'बैठका होतात, चर्चा होते; पण प्रश्न कायमच राहतात' अशीच भावना जनतेत दृढ होत राहील.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



# ‘वन क्लिक’ने खात्यात जमा होणार पीकविमा

## एनसीआयपीकडे परिगणना अंतिम टप्प्यात

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १७ फेब्रुवारी-**

खरीप हंगामातील नुकसानीनंतर पीकविमा भरपाईची प्रक्रिया अंतिम टप्प्यात पोहोचली आहे. राज्य सरकारने पीक कापणी प्रयोगांचा अहवाल (एनसीआयपी) कडे पाठवला असून सध्या तांत्रिक परिगणना सुरू आहे. या प्रक्रियेनंतर उंबरठा उत्पादनाच्या निकषांनुसार कोणत्या शेतकऱ्यांना विमा मिळणार हे स्पष्ट होणार आहे. त्यानंतर ‘वन क्लिक’ पद्धतीने भरपाईची रक्कम थेट शेतकऱ्यांच्या बँक खात्यात जमा केली जाणार आहे.

सोलापूर जिल्ह्यात खरीप हंगामात ४ लाख ५७ हजार ३७८ हेक्टरवर पेरणी झाली होती. सुरुवातीला पावसाची साथ मिळाल्याने पिकांची स्थिती चांगली होती; मात्र ऑगस्ट-सप्टेंबरमध्ये झालेल्या अतिवृष्टीमुळे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले. राज्य सरकारने पीक नुकसानीपोटी १ हजार ५०० कोटी रुपये तर जमीन खरवड नुकसानासाठी ५८ कोटी रुपयांची मदत जाहीर करून वितरित केली आहे. तरीही शेतकरी पीकविमा भरपाईच्या प्रतीक्षेत आहेत.

जिल्हा कृषी विभागाने तूर व कांदा वगळता सोयाबीन, मूग, उडीद, बाजरी आदी पिकांचे पीक कापणी प्रयोग पूर्ण करून सरासरी उत्पादनाचा अहवाल कृषी आयुक्तालयाकडे पाठवला आहे. आयुक्तालयामार्फत हा अहवाल एनसीआयपीकडे पाठवण्यात आला आहे. तूर आणि कांद्याचे पीक कापणी प्रयोग सुरू असून त्यांचा अहवाल लवकरच सादर केला जाणार आहे.

जिल्ह्यातील खरीप पीकविमा आकडेवारीनुसार ३ लाख २९ हजार ३२२ शेतकऱ्यांनी विमा घेतला आहे. २ लाख ४९ हजार ७३८.४४ हेक्टर क्षेत्र विमा संरक्षित आहे. शेतकरी हिस्सा १८ कोटी २३ लाख ४४ हजार ९५९ रुपये असून एकूण विमा हप्ता १५१ कोटी १८ लाख १४ हजार २०४ रुपये आहे. विमा संरक्षित रक्कम १०९८ कोटी ४३ लाख ५८ हजार ९७३ रुपये इतकी आहे.

सुधारित पीकविमा योजनेनुसार महसूल मंडळ किंवा तालुकास्तरावर घेतल्या जाणाऱ्या पीक कापणी प्रयोगांच्या आधारे भरपाई दिली जाते. मागील सात वर्षांतील सर्वोत्कृष्ट पाच वर्षांच्या सरासरी उत्पादनावर ७० टक्के जोखीम स्तर लागू करून उंबरठा उत्पादन निश्चित केले जाते. प्रत्यक्ष उत्पादन हे उंबरठ्यापेक्षा कमी आल्यास त्या क्षेत्रातील सर्व विमाधारक शेतकऱ्यांना नुकसान भरपाई मिळते. २०२५-२६ खरीप हंगामासाठी ७० टक्के जोखीम स्तर निश्चित करण्यात आला आहे.सध्या एनसीआयपीकडून तांत्रिक परिगणना सुरू असून अंतिम निर्णय केंद्र सरकारकडून जाहीर होणार आहे. निर्णयानंतर भरपाईची रक्कम एका क्लिकवर शेतकऱ्यांच्या खात्यात जमा केली जाणार आहे. त्यामुळे आता शेतकऱ्यांचे लक्ष केंद्राच्या घोषणेकडे लागले आहे.

### ७० टक्के जोखीम स्तराची अट म्हणजे काय?

सुधारित पीकविमा योजनेनुसार महसूल मंडल किंवा तालुकास्तरावर घेतल्या जाणाऱ्या पीक कापणी प्रयोगांच्या आधारावर पीकविम्याची भरपाई मिळणार आहे. जर पीक कापणी प्रयोगातून मिळालेले सरासरी उत्पादन संबंधित क्षेत्रातील उंबरठा उत्पादनापेक्षा कमी असेल, तर त्या भागातील सर्व विमाधारक शेतकऱ्यांना नुकसान भरपाई दिली जाईल. उंबरठा उत्पादन म्हणजे त्या अधिसूचित विमा क्षेत्रासाठी ठरवलेले हमी उत्पादन आहे. मागील सात वर्षांतील सर्वोत्कृष्ट पाच वर्षांचे सरासरी उत्पादन गुणिले ७० टक्के जोखीम स्तर अशाप्रकारे उंबरठा उत्पादन निश्चित केले जाते. २०२५-२६ खरीप पिकांसाठी ७० टक्के जोखीम स्तर निश्चित केला आहे. ही उत्पादन पातळी गहाण मानून त्यापेक्षा कमी उत्पादन झाल्यास नुकसान मानले जाईल.

### खरीप पिकांची पीक कापणी

प्रयोगाचा अहवाल आयुक्तालयाला पाठवला आहे. तूर, कांदा पीक कापणी प्रयोग सुरू आहेत. त्यानंतर त्याचा अहवाल पाठवण्यात येईल.

**- शुक्राचार्य भोसले, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी, सोलापूर**

# ‘त्या’ खून प्रकरणी एकाची निर्दोष मुक्तता

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १७ फेब्रुवारी-**

चिप्पा मार्केट खून प्रकरणी प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधिश मनोज एस. शर्मा यांनी एकाची निर्दोष मुक्तता केली आहे. बबलू गुलाब हुंडेकरी (वय-२७, रा. पद्मानगर, मस्जिदजवळ) याचा खून केल्याचे आरोपावरुन आरोपी बसवराज रविंद्र अतनुरे (वय-२५ वर्षे, रा. पद्मानगर, मस्जिदजवळ) याची ही निर्दोष मुक्तता केली आहे.

सदर गुन्हयाची हकीकत अशी की, दि.१५ जानेवारी २०२३ रोजी यातील फिर्यादी पो-कॉ. संदीप माधवराव गुट्टे ने. मा. जेलरोड पोलिस स्टेशन, सोलापूर हे कर्तव्यात असतांना सकाळी ८.२० वा. अशोक चौक पोलिस चौकी येथे हजर असतांना एक इसम नामे प्रशांत तिपण्णा देवकर हे एका इसमाचा खून झाला आहे असे सांगितले. त्यावेळेस फिर्यादी संदीप गुट्टे व पो. हे. कॉन्स्टेबल घुगे असे तात्काळ सदर ठिकाणी जाऊन पाहणी केली असता अशोक चौक येथील चिप्पा मार्केट कट्टा क्र.१२७ या कट्ट्यावर एका अज्ञात इसमाचे खून झाल्याचे दिसले. त्याचे डोक्यात फरशी घालून खून झाल्याचे दिसत होते. त्याप्रमाणे यातील फिर्यादी पो. कॉ. संदीप माधवराव गुट्टे यांनी जेलरोड पोलिस स्टेशन, सोलापूर येथे अज्ञात इसमाविरुध्द फिर्याद दिली होती.

तपासा दरम्यान सी.सी.टी.व्ही. फुटेजच्या आधारे यातील आरोपी बसवराज रविंद्र अतनुरे यास अटक करण्यात आली. त्यांनी यातील मयत बबलु गुलाब हुंडेकरी याचा खून केल्याचे कबूल करुन, मयताचे मोबाईल, पाकीट व आरोपीचे कपडे जप्त केले होते. याकामी एकूण १५ साक्षीदार तपासण्यात आले होते. परंतु आरोपीचे वकील ॲड. इस्माईल एन. शेख यांनी असा युक्तिवाद केला की, मे. कोर्टासमोर आलेल्या पुराव्यामध्ये खून करण्याचा हेतू काय होता हे शाबित झाला नाही, त्याचप्रमाणे गुन्हयाचे ठिकाणाचे सी.सी. टी.व्ही. फूटेज ज्यामधून कट्टा क्र. १२७ दिसतो, तो फुटेज पोलिसांनी जप्त केला नाही. आहे ते सी.सी.टी. व्ही. फुटेजमध्ये मयत बबलू हुंडेकरी व आरोपी यांचे चेहरे स्पष्ट दिसत नाही.

त्यामुळे त्यात दोघेही तेच आहेत हे शाबित झाले नाही, व सरकारतर्फे परिस्थितीजन्य पुरावा शाबित झाला नाही, असा युक्तिवाद ॲड. इस्माईल एन. शेख यांनी केला. सदरचा युक्तीवाद प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधिश यांनी ग्राहय धरुन आरोपी बसवराज रविंद्र अतनुरे यांनी निर्दोष मुक्तता केली. सदरकामी आरोपी तर्फे ॲड. इस्माईल एन. शेख, ॲड. सिराज रजाक शेख, वसीम शेख यांनी काम पाहिले. सरकारतर्फे ॲड. आनंद कुर्दुकर यांनी काम पाहिले.



# बीएमआयटीमध्ये गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार सोहळा

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १७ फेब्रुवारी-**

येथील ब्रह्मदेवदादा माने इस्टिट्युट ऑफ टेक्नोलॉजी, (बीएमआयटी) महाविद्यालयात दि. १६ फेब्रुवारी २०२६ रोजी प्रथम वर्ष प्रथम सत्राचे विद्यापीठ परीक्षेतिल गुणवंत विद्यार्थ्यांच्या सत्कार समारंभाचे आयोजन मोठ्या उत्साहात करण्यात आले.

या कार्यक्रमासाठी संस्थेच्या सचिव जयश्री माने या प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थित राहुन यशस्वी विद्यार्थ्यांचा सत्कार केला. संस्थेचे अध्यक्ष माजी आमदार दिलीप माने, उपाध्यक्ष डॉ. पृथ्वीराज माने व कॅम्पस डारेक्टर प्रा. राहुल माने यांनी सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी बीएमआयटीचे प्राचार्य डॉ. आर. डी. कुलकर्णी होते. यावेळी विविध विभागांतील टॉपर विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. गुणवंत विद्यार्थ्यांच्या यशामागे त्यांची मेहनत, शिक्षकांचे मार्गदर्शन व पालकांचे पाठबळ महत्त्वाचे असल्याचे मत प्रमुख पाहुण्यांनी व्यक्त केले. या कार्यक्रमास गुणवंत विद्यार्थ्यांचे पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या सत्कार समारंभाचे आयोजन प्रथम वर्ष विभाग प्रमुख प्रा. अश्विन भोपळे व कार्यक्रमाचे समन्वयक डॉ. बी. एम. मोरे यांनी नियोजन यशस्वीरीत्या पार पाडले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. व्ही. व्ही. बिनगे यांनी केले, तर आभारप्रदर्शन प्रा. एस. ए. गायकवाड यांनी केले.

## ज्ञानामृत आनंदलहरी - १३५९

**तुका म्हणे वज्र भंगे एक वेळ ।**
**कळीण हा खळ तयाहूनी ।।**

आपल्याकडून होणाऱ्या वर्तनावरून आपण चांगले किंवा वाईट ठरत असतो. आपले वर्तन अयोग्य असले तरी लोकांनी आपणाला चांगले म्हणावे असे आपणाला वाटत असते. आपल्याप्रमाणे दुष्कृत्य करणाऱ्या इतरांनाही असेच वाटत असावे. आपणाला जोपर्यंत आपण करीत असलेले कार्य, वर्तन वाईट आहे, दुष्ट आहे असे वाटत नाही, तोपर्यंत आपल्यात सुधार होणे कठीण आहे. समोरच्याने आपली चूक, आपले दुष्कृत्य आपल्या निदर्शनास आणून दिले तर आपण त्यावर विचार करायला हवा. जा तुला काय करायचे आहे, असे म्हणणे चुकीचे असते. आपणाला लोकांनी चांगले म्हणावे म्हणूनच आपण चांगले वागावे असे नाही तर आपले वर्तन आपणाला मन:पूर्वक पटावे म्हणून आपण चांगले वागायला हवे. चांगले वागण्याची मनोवृत्ती निर्माण होणे म्हणजे चांगुलपणाच्या वाटेवर पाऊल पडणे होय. पण संसारात



अडकलेल्या अनेक जीवांना स्वार्थ, अहंकार, काम, क्रोध, ईर्षा, द्वेष, मत्सराने घेरल्याने त्यांना दुष्कृत्यातून अजिबात बाहेर पडावे वाटत नाही. कोणी सांगितले तरी त्यांचे ऐकावे वाटत नाही. दुष्कृत्यावर स्थिर असणाऱ्या अशा लोकांवर कोणाच्याही मार्गदर्शनाचा, सहवासाचा परिणाम होत नाही. एखाद्यावेळी वज्र भंग पावू शकेल. पण हे वज्रापेक्षाही मनाने कठीण होऊन बसलेले लोक वाईटत्व भंग पावू देत नाहीत, किंवा त्यांचे वाईटत्व कोणाला नष्ट करता येत नाही. या अनुषंगाने बोलतांना तुकाराम महाराज म्हणतात, तुका म्हणे वज्र भंगे एक वेळ । कठीण हा खळ तयाहूनी ।।

कोणत्याही परिस्थितीत आपला हेकेखोरपणा, किंवा कुवर्तन न सोडणारे लोक आपण समाजात किंवा आपल्या घरातही पाहातो तसेच अशांना आपण अनुभवतो. अशा लोकांना कितीही समजावले तरी ते उलट आपणालाच समजावतात. आम्ही करतो तेच बरोबर आहे किंवा आम्ही असे कांही केलेच नाही, असे म्हणून आपल्या दुष्कृत्यावर पांघरूण घालतात. ज्यांना स्वत:ची चुक मान्यच नसते, त्यांच्यात परिवर्तन करणे कठीण असते. चूक मान्य होणे म्हणजे सुधारण्याच्या मार्गावर पाहिले पाऊल टाकणे होय. अंगात मी भरला असेल तर दुसऱ्याचे विचार डोक्यात शिरत नाहीत. आपली चूक आपणाला कळत नाही म्हणून किमान दुसरा काय सांगतो, ते तरी आपण ऐकायला हवे. समोरच्याच्या सांगण्याप्रमाणे आपण करावेच किंवा वागावेच असे नसले तरी त्यावर सकारात्मक विचार करायला काय हरकत आहे. मी करतो तेच योग्य व खरे आहे असे म्हणणारे लोक बऱ्याचवेळा स्वत:चे व त्यांच्याबरोबर इतरांचे भरपूर नुकसान करून जातात. आपण संत श्रेष्ठ ज्ञानोबाराय, तुकोबाराय, संत चोखोबा महाराज अशा संतांच्या सहवासात राहणारे लोक आहोत. त्यामुळे आपल्याकडे मी असण्याचा म्हणजेच वाईटपणा असण्याचा प्रश्नच नसावा, असे आम्हास वाटते. मीपणा गेला की आनंद आपोआप येत असतो. जय जय राम कृष्ण हरी।

**- ज्ञानदास डॉ. विजयकुमार फड**
**मो. ९४२२२१६४४८**

## सुप्रभात

### आजचा दिवस

वार : बुधवार,
दि. १८ फेब्रुवारी २०२६
विक्रम संवत् २०८२ । शके -१९४७
संवत्सर - विश्वावसु
मास - फाल्गुन शु. प्रतिपदा
ऋतु - वसंत ।
नक्षत्र- शततारका (२१.१५)
योग - शिव (२२.४४)
करण - बालव (२८.३१)
राहू काल :
बुधवार : दु. १२ ते १.३०

दिनविशेष :
१९११: भारतात अलाहाबाद ते नैनी या दरम्यान पहिल्यांदा विमानाद्वारे टपाल पाठवण्यात आले. १९४६: मुंबईमध्ये ऐतिहासिक नौसेनेचा विद्रोह झाला. २००१: ज्येष्ठ संगीतकार व गायक भूपेन हजारिका यांना मध्यप्रदेश सरकारचा प्रतिष्ठित लता मंगेशकर पुरस्कार प्रदान करण्यात आला. २०२१: नासाचे 'पर्सिव्हिअरन्स' रोव्हर मंगळ ग्रहावर सुखरूप पोहोचले.



# शमा शाळेत उर्दू दिवस उत्साहात

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १७ फेब्रुवारी-**

मजरेवाडी येथील शमा उर्दू शाळेत तमसीली मुशायरे द्वारा जुन्या कवींची आठवण करत त्यांचे विविध रचना विद्यार्थ्यांनी सादर करून वाह वाह मिळविली.

तमसिली मुशायरेत प्रतिकात्मक काव्य संमेलनात कवींचे कपडे वेशभूषा धारण करणे हे फॅशन शो नसून ह्याच्या माध्यमातून ऊर्दू साहित्यिक वारसा जपण्याची एक संधी असते आणि विशेष म्हणजे स्थानिक कवींना या माध्यमातून आपण त्याची आठवण व त्याच्या साहित्य चालू पिढीपर्यंत पोहचवीत असतो म्हणून असे कार्यक्रम वेळोवेळी होणे गरजेचे वाटते, असे मत शमा उर्दू शाळेत उर्दू दिवसा निमित आयोजित तमसीली मुशायरेत'' उर्दूचे ज्येष्ठ साहित्यिक प्रा डॉ रशीद शेख यांनी व्यक्त केले. अध्यक्षस्थानी शमा संस्थेचे अध्यक्ष अय्यूब अहमद नल्लामंदू होते. प्रा बी एच करजगीकर यांच्या हस्ते दीप प्रज्वलित करून काव्य संमेलनाचे उद्धाटन झाले. अबरार अहमद यांनी प्रस्ताविक केले. प्र. मुख्यध्यापिका यास्मीन बिजापूरे यांच्या देखरेखेखाली झालेल्या या प्रतिकात्मक काव्य संमेलन साठी कवियत्रि शाहीन शकील सदफ यांनी सुत्रसंचालन करून मुशायरेत रंगत आणली

### दिवंगत कवीच्या विविध रचना सादर

या तमसीली मुशायरेत स्थानिक कवी स्व. कदीर सोलापूरी व स्व नसीम मन्नान यांचे कविता शेख शरजील शेख रेहान यांनी सादर केले. कवियत्रि सबा बलामपूरी पटेल ज़ारा, शबीना अदीब शेख आसीया, हिमांशी बाबरा-शेख रुखसार, परवीन शाकीर-शेख जैनाब, शायस्ता सना-साबूनगर उज़मा, लता हया-शिबा पटेल, कवी इम्रान प्रतापगडी-कासीम पटेल, बशीर बद्र नदाफ फैज़ान, राहत इंदोरी -शेख अखलाक, इकबाल अशअर-शेख ज़िया, सय्यद खन्सा यांनी सहभागी होऊन दिवंगत कवीच्या विविध रचना सादर केले व त्यांच्या आठवणीना उजाळा दिला .

## पोलिस भरतीत ४१८ उमेदवारांचा सहभाग

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १७ फेब्रुवारी-**

ग्रामीण पोलीस घटकात दि. ११ फेब्रुवारी २०२६ पासुन पोलीस शिपाई भरती २०२४-२५ ची प्रक्रिया सुरु झाली. दि. १६ फेब्रुवारी २०२६ रोजी एकूण ८४४ पुरुष उमेदवार शारिरीक मोजमाप व मैदानी चाचणी करीता बोलाविण्यात आले आहे त्यापैकी ४१८ उमेदवारांनी पोलीस भरतीमध्ये भाग घेतला आहे. सर्व ६३४ उमेदवारांचे शारिरीक मोजमाप घेण्यात आले असुन त्यापैकी एकुण ४४ उमेदवार हे शारिरीक मोजमापात अपात्र ठरलेली असुन एकुण ३७४ उमेदवार यांची मैदानी चाचणी १६०० मिटर धावणे, १०० मिटर धावणे व गोळा फेकीची चाचणी पूर्ण झाली आहे. १३३ उमेदवार हे मैदानी चाचणीत अपात्र ठरलेले असुन एकुण २४१ उमेदवार हे मैदानी चाचणीत पात्र ठरलेले आहेत. मंगळवार दि. १७ फेब्रुवारी २०२६ रोजी ८३९ महिला उमेदवार या शारिरीक मोजमाप व मैदानी साठी हजर राहिल्या.



# ट्विंकल हायस्कूलचे ऑलिंपियाड मास्टर्स परीक्षेत यश

### मायशा पानगल जिल्ह्यात प्रथम व सफुरा शेख विज्ञान विषयात प्रथम

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १७ फेब्रुवारी-**

येथील ट्विंकल इग्लिश मीडियम हायस्कुलच्या विद्यार्थ्यांनी मित्सुरे ऑलिंपियाड मास्टर्स २०२५-२६ परीक्षेत यश मिळविले. मायशा मुबिन पानगल इयत्ता ९ वी हिने गणित आणि विज्ञान या दोन विषयात जिल्ह्यातून प्रथम क्रमांक पटकविला व सफुरा साबिर शेख इयत्ता ८वी हिने विज्ञान विषयात प्रथम क्रमांक मिळविला. शाळेच्या संचालिका सफिया खान यांनी यशस्वी सर्व विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

**कामगिरी :** वर्ग २ मध्ये आलेले विद्यार्थी : गणित : सोबीया शेख, श्रुष्टी कोळीमयेशा पीरजादे. विज्ञान : जिल्हा- रँक ३ : हलिमा पटेल (गणित), झीशान लंगोटे (इव्हीस), अमिरा पांगल (विज्ञान), नफिसा बागवान (विज्ञान), शिवानी कोळी (विज्ञान). रँक ४ : तोहीद शेख (इव्हीस), अरफात पीरजादे (विज्ञान), अलिया जमादार (गणित), निदा शेख (विज्ञान). रँक ५ : मुक्तशिद पठान (गणित), राहील पटेल (इव्हीस), अलिया यतनाळ (विज्ञान), सफवान शेख (गणित). रँक ६: अफ्फान पठान (इव्हीस), हादी सय्यद (गणित), वझीफा काझी (विज्ञान), रँक ७ : मोह. मोईझ पटेल (गणित), अयेशा पटेल (गणित), अलिया येतनाळ (गणित). रँक ८ : असद मुल्ला (गणित), अमिरा पानगल (गणित), अ. हादी सय्यद (विज्ञान). रँक ९ : झीकरा शेख (गणित). रँक १० : फरीझा तांबोळी (गणित). हे विद्यार्थी सोलापूर जिल्ह्यातून रँक मध्ये आले आहेत.



# लक्ष्मीबाई केळकर यांच्या जीवनावर रंगले अभिवाचन

### ब्रम्हवादिनी सखी मंचचा उपक्रम

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १७ फेब्रुवारी -**

सोलापूर ब्रम्हवादिनी सखी मंचच्यावतीने रविवारी सायंकाळी लोकमान्य टिळक सभागृहात राष्ट्र सेविका समितीच्या संस्थापिका कर्मयोगीनी लक्ष्मीबाई उपाख्य मावशी केळकर यांच्या जीवनावर आधारित अभिवाचनाचा कार्यक्रम झाला.

प्रमुख पाहुणे सीए डॉ. सुनील इंगळे आणि गायत्री सुमंत यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून कार्यक्रमाची सुरुवात झाली.राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे राजेंद्र काटवे, नगरसेविका गीता गवई, अनुजा जोशी, देवयानी देशमुख यांची उपस्थिती होती. मृण्मयी वैद्य, डॉ. एकता कुलकर्णी, स्वाती जोशी, संजीवनी जोशी, रोहिणी गोरे, डॉ. भूषण कुलकर्णी, ओंकार कुलकर्णी या कलाकारांनी या अभिवाचनात भाग घेतला होता. अद्वैत खेडकर यांनी पार्श्वसंगीत दिले होते.

आद्यब्रह्मवादिनी फाउंडेशनच्या संस्थापिका वृषाली शिलेदार यांची संकल्पना असलेल्या या कार्यक्रमाचे संहिता लेखन डॉ. छाया नाईक यांनी केले होते. या प्रकल्पाच्या प्रमुख व पालक जयश्री धर्माधिकारी तर ओंकार कुलकर्णी यांनी या कार्यक्रमाचे दिग्दर्शन केले होते.

संघटिका डॉ.एकता कुलकर्णी, स्वाती जोशी, जुने विठ्ठल मंदिर, जोशी परिवार, राष्ट्रीय स्वयंसेवक संघ, राष्ट्र सेविका समिती तसेच मल्लिकार्जुन डेव्हलपर्सचे यश खेड आणि सुमेध जोशी यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाला रसिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. अंजली कुर्डुकर यांनी सूत्रसंचालन केले.

# ज्येष्ठ प्राध्यापकांच्या प्रेरणादायी कार्यामुळे नवसमाजाची निर्मिती

## ज्येष्ठ शिक्षकांचा सत्काराप्रसंगी प्राचार्य के. एम. जमादार यांचे प्रतिपादन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १७ फेब्रुवारी-**

सेवानिवृत्त प्राचार्य व प्राध्यापक यांनी आयुष्यभर असंख्य विद्यार्थी घडविले म्हणून त्यांचे जीवन कृतकृत्य झाले आहे त्यांची मूल्यनिष्ठा आणि सेवाभावी वृत्ती म्हणजे तेजस्वी यशोगाथाच आहे. ज्येष्ठ शिक्षकांच्या व्यक्तिमत्त्वातील साधेपणा, कार्यातील सातत्य आणि विचारातील प्रगल्भता यामुळेच सक्षम नवसमाजाची निर्मिती झाली आहे, असे प्रतिपादन प्राचार्य के. एम. जमादार यांनी केले

सात रस्ता मोदी खाना येथील लक्ष्मीबाई भाऊराव पाटील महिला महाविद्यालयाच्या सभागृहात असोसिएशन ऑफ कॉलेज अँड युनिव्हर्सिटी सुपर अँन्यूएटेड टीचर्स संघटनेच्या वतीने वयाची ७५, ८०, ८५ व ९० वर्ष पूर्ण केलेल्या २३ सेवानिवृत्त प्राचार्य व प्राध्यापकांचा सत्कार करण्यात आला त्यावेळी ते बोलत होते. यावेळी व्यासपीठावर संघटनेचे जिल्हा अध्यक्ष प्राचार्य एम. ए. शेख, उपाध्यक्ष डॉ. लक्ष्मीकांत तायडे आदी उपस्थित होते



प्राचार्य एम. ए. शेख म्हणाले, आयुष्यभर जपलेली तत्त्वनिष्ठा आणि माणुसकी हीच अमृत महोत्सव पूर्ण केलेल्या प्राचार्य व प्राध्यापकांची खरी ओळख आहे. संकटसमयी धैर्याने उभे राहणे, यशातही विनम्र राहणे आणि प्रत्येकाला आपलेसे करण्याची त्यांची वृत्ती आजच्या पिढीसाठी आदर्श ठरली आहे. प्रा उत्तमराव चौगुले प्रास्ताविकात म्हणाले, सेवानिवृत्त जेष्ठ प्राचार्य व प्राध्यापकांच्या कार्यामुळे विद्यार्थ्यांच्या जीवनात आशेचा किरण निर्माण झाला, हीच त्यांच्या आयुष्याची खरी कमाई आहे.पंच्याहत्तरी पूर्ण करणे हा केवळ आयुष्याचा टप्पा नसून, अनुभवसंपन्नतेचा आणि जीवनसमृद्धीचा उत्सव आहे. त्यांनी समाजाला दिलेल्या योगदानाबद्दल आम्ही कृतज्ञ आहोत. प्रा डॉ लक्ष्मीकांत तायडे म्हणाले की पुढील उत्तम आरोग्य, दीर्घायुष्य आणि अखंड उत्साह, यामुळे अमृत महोत्सवी आयुष्य पूर्ण करणाऱ्या शिक्षकांचे कार्य समाजाला मार्गदर्शन करत राहील,

यावेळी प्रा. डॉ. मनोहर चव्हाण, प्राचार्य. डॉ. वसंतराव बनसोडे, प्रा. द्युत, प्रा. आरबाळे, प्रा. वाय एन माने, प्राचार्य नरेश बदनोरे, डॉ. श्रीकांत येळेगावकर, डॉ फातिमा सय्यद प्रा मोहिनी पत्की यांच्यासह सुमारे ५२जण उपस्थित होते. केंद्रीय कार्यकारिणीचे अध्यक्ष डॉ. एम. ए. वाहुळ, सचिव डॉ. जे. एम. मंत्री, कोषाध्यक्ष प्राचार्य सुभाष नाफडे यांनी ज्येष्ठ प्राचार्य व प्राध्यापकांचे कौतुक करून त्यांना शुभेच्छा दिल्या. सूत्रसंचलन डॉ नभा काकडे यांनी केले. कोषाध्यक्ष डॉ विद्यासागर आगसे यांनी आभार मानले

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा,
छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली,
जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर
(कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## महत्वाचे...



### सहाय्यक पोलिस निरीक्षक हेमंत काटकर यांचा एकता मंचतर्फे सत्कार

**वैराग, दि. १७ फेब्रुवारी-**
पांगरी पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक हेमंत काटकर यांची बदली झाल्याने एकता महिला मंचच्या वतीने त्यांचा गौरव करण्यात आला. सन्मान सोहळ्यास पोलीस उपनिरीक्षक यवलकर, पोलीस कॉन्स्टेबल लोकरे, माने, क्षीरसागर, शिंदे एकता महिला मंचचे प्रमुख प्रभाकर क्षीरसागर यांच्यासह एकता महिला मंचच्या तालुका सचिव जास्मिन शेख, स्वाती जोगदंडकर, नूरजहाँ शेख, सुवर्णा व्हटकर, सारिका ढवारे, मैना जाधव, सविता गरड, सिंधू झिंगे, शबाना शेख, नीता हाके, करिष्मा शेख, प्रियंका शिंदे, ताहिरा मुलाणी, अंजुम सय्यद, साजिदा सय्यद उपस्थित होते. प्रास्ताविक व सूत्रसंचालन प्रभाकर क्षीरसागर यांनी केले आभार नूरजहाँ शेख यांनी मानले.



### लायन्स शिशु विकास मंदिर व शाळेचे स्नेहसंमेलन उत्साहात

**अक्कलकोट, दि. १७ फेबुवारी-**
लायन्स क्लब ऑफ अक्कलकोट ट्रस्ट संचलित लायन्स शिशु विकास मंदिर व लायन्स प्राथमिक शाळा अक्कलकोटचा वार्षिक स्नेहसंमेलन व पारितोषक वितरण समारंभ सोहळा प्रियदर्शनी मंगल कार्यालय येथे संपन्न झाला. सोहळ्याचे दीपप्रज्वलन श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे विश्वस्त व अन्नछत्र मंडळाची सहयोगी संस्था असलेल्या हिरकणी महिला बहुउद्देशीय संस्थेच्या संस्थापिका अध्यक्षा अलका जनमेजयराजे भोसले यांच्या उपस्थित मान्यवरांच्या हस्ते संपन्न झाला. अनिल राठोड यांनी प्रशिक्षण दिलेल्या छावा व रामायण या पात्रांना उपस्थितांनी भरभरून दाद दिली. कार्यक्रमास लायन्स क्लब अक्कलकोट ट्रस्टचे अध्यक्ष व शाळा व्यवस्थापन समितीचे चेअरमन राजेंद्र हत्ते, लायन्स क्लब अक्कलकोट अध्यक्ष अभय खोबरे, माजी प्रांतपाल राजशेखर कापसे, चार्टर मेंबर संस्थापक डॉ. अरुण परिचारक, झोन चेअर पर्सन मल्लिकार्जुन मसुती प्रमुख उपस्थित होते. याप्रसंगी सुभाष गडसिंग, शिरीष पंडित, शिवशरण खुबा, खजिनदार विठ्ठलराव तेली, प्रभाकर मजगे, मल्लिनाथ साखरे, सहीद वळसंगकर, प्रकाश उण्णद, सुभाष खमितकर, महिबूब सलगरकर, सिद्धय्या मठ, शिवपुत्र हळगोदे, प्राथमिक शाळा मुख्याध्यापिका श्रीदेवी खुने, शिशु विकास मंदिरचे मुख्याध्यापिका महानंदा निलगार, गौरीशंकर चनशेट्टी, श्रद्धा बागुल, समर्थ चितली, जान्हवी गव्हाणे रमेश शिंदे उपस्थित होते.



### रोटरी क्लब अक्कलकोट येथे डिस्ट्रिक्ट गव्हर्नर सुधीर लातुरे यांची भेट

**अक्कलकोट, दि. १७ फेब्रुवारी -**
रोटरी क्लब अक्कलकोट येथे डिस्ट्रिक्ट प्रांतपाल रो. सुधीर लातुरे यांनी सदिच्छा भेट देत क्लबच्या विविध सामाजिक उपक्रमांचा आढावा घेतला. यावेळी फर्स्ट लेडी रसंगीता लातुरे, डी.जी. सेक्रेटरी तापडिया, असिस्टंट गव्हर्नर सचिन चौधरी उपस्थित होते. प्रारंभी अध्यक्ष गुरुशांतप्पा पाटील, सचिव प्रदीप तोरस्कर, कोषाध्यक्ष केदार नरोणे व सर्व रोटेरियन सदस्यांनी मान्यवरांचे स्वागत केले. डिस्ट्रिक्ट गव्हर्नर यांनी क्लबतर्फे राबविण्यात आलेल्या विविध सेवा व सामाजिक उपक्रमांची माहिती जाणून घेतली. नेशन बिल्डर अवॉर्ड हरदास व देसाई यांना तर व्होकेशनल अवॉर्ड रायप्पा बिराजदार व अब्दुलरजाक पठाण यांना प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. कार्यक्रमामध्ये अक्कलकोट रोटरी क्लब पुरस्कृत मल्लिकार्जुन इट्रॅक्ट क्लब किणी याची नवीन मंजुरी रोटरी इंटरनॅशनलकडून मिळालेली आहे त्याचे रोटरी इंटरनॅशनल चार्टर क्लब मेंटर तुळजापूरे यांना डिस्ट्रिक्ट गव्हर्नर सुधीर लातुरे यांच्या हस्ते मंजुरी पत्र प्रदान करण्यात आले. सूत्रसंचालन नितीन पाटील यांनी केले. आभार प्रदीप तोरस्कर यांनी मानले.

### दामाजी कारखान्याचा गळीत हंगामाचा आज सांगता समारंभ

**मंगळवेढा, दि. १७ फेब्रुवारी-**
श्री संत दामाजी सहकारी साखर कारखान्याच्या सन २०२५-२६ सिझनचा ३३ व्या गळीत हंगामाचा सांगता समारंभ आज दुपारी ४ वाजताचे मुहूर्तावर कारखान्याचे चेअरमन शिवानंद यशवंत पाटील यांच्या हस्ते व कारखान्याचे व्हाईस चेअरमन तानाजी खरात यांचे अध्यक्षतेखाली होणार आहे. कारखान्याचे संचालक श्री महादेव सखाराम लुगडे व त्यांच्या सुविद्य पत्नी लता महादेव लुगडे या उभयतांचे हस्ते श्री सत्यनारायण महापूजेचे आयोजन केले असल्याची माहिती कारखान्याचे प्र. कार्यकारी संचालक रमेश जायभाय यांनी दिली. याप्रसंगी कारखान्याचे व्हाईस चेअरमन तानाजी खरात, संचालक मुरलीधर दत्तू, गौरीशंकर बुरकूल, गोपाळ भगरे, राजेंद्र चरणुकाका पाटील, भारत बेदरे, दयानंद सोनगे, औदुंबर वाडदेकर, रेवणसिध्द् लिगाडे, भिवा दोलतडे, बसवराज पाटील, गौडाप्पा बिराजदार, दिगंबर भाकरे, महादेव लुगडे,तानाजी कांबळे, प्रथमेश पाटील, तानाजी काकडे, सुरेश कोळेकर उपस्थित होते.

# वाळूज-साखरेवाडी रस्ता खड्ड्यांच्या विळख्यात

**नागरिक त्रस्त, अपघातांचा धोका वाढला**



**तभा वृत्तसेवा,**
**वाळूज, दि. १७ फेब्रुवारी-**
मोहोळ तालुक्याच्या सीमेवर असलेल्या वाळूज-साखरेवाडी या सोलापूरला जोडणाऱ्या महत्त्वाच्या संपर्क रस्त्याची अवस्था अत्यंत दयनीय बनली आहे. सुमारे चार किलोमीटर अंतरावरील या रस्त्यावर डांबरीकरणाचा नामोनिशानही उरलेला नाही. रस्त्याचा काही भाग पूर्णपणे उखडून गेलेला असून सर्वत्र मोठमोठे खड्डे, दगड आणि धुळीचे साम्राज्य पाहायला मिळत आहे. परिणामी दैनंदिन प्रवास नागरिकांसाठी त्रासदायक ठरत असून अपघातांचा धोका वाढला आहे.

ऊस वाहतुकीसाठी मोठी वाहने सुरू होताच रस्त्याची दुरवस्था अधिक प्रकर्षाने समोर येते. यंदाही त्याला अपवाद राहिलेला नाही. साखरेवाडी (ता. उ. सोलापूर हद्द) पर्यंतच्या मार्गावर जागोजागी खड्डे पडल्याने दुचाकीस्वार, चारचाकी वाहनधारक तसेच पादचारी यांची मोठी तारांबळ उडत आहे. रात्रीच्या वेळी या रस्त्यावरून प्रवास करणे अधिकच धोकादायक ठरत आहे.

या परिसरात १०० ते २०० घरे असून सुमारे दोन ते अडीच हजारांची लोकवस्ती आहे. शाळा-कॉलेजला जाणाऱ्या विद्यार्थ्यांना, गरोदर महिलांना, ज्येष्ठ नागरिकांना व आजारी रुग्णांना या रस्त्यामुळे मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. रस्त्यावर टाकलेल्या खडीत घसरून किरकोळ जखमी झाल्याच्या घटनाही घडल्याची माहिती स्थानिकांनी दिली. अनेक वेळा वाहने पंक्चर होण्याचे प्रकार वाढल्याने वाहनधारकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.

> वाळूज-साखरेवाडी हा आमच्यासाठी अतिशय महत्त्वाचा रस्ता आहे. पण सध्या या रस्त्याची अवस्था अत्यंत वाईट झाली आहे. सर्वत्र मोठमोठे खड्डे पडले असून दुचाकी चालवताना जीव मुठीत घेऊन प्रवास करावा लागतो. प्रशासनाने तात्काळ पाहणी करून रस्त्याचे डांबरीकरण पूर्ण करावे, ही आमची मागणी आहे.
> **- हुसेन शेख, वाळूज**

> चार किलोमीटरचा महत्त्वाचा संपर्क मार्ग गेल्या अनेक वर्षापासून डांबरीकरणाविना आहे प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे ग्रामस्थांची तीव्र नाराजी आहे. दरवर्षी ऊस वाहतूक सुरू झाली की या रस्त्याची खरी परिस्थिती समोर येते. मोठ्या वाहनांमुळे खड्डे अधिक वाढले आहेत. खडी टाकून तात्पुरती मलमपट्टी केली जाते, पण त्याने त्रासच वाढतो.
> **-आनंद डोलारे**

## ‘सिंहगड’मध्ये विद्यार्थिनींसाठी स्वसंरक्षण प्रशिक्षणातून आत्मविश्वासाला बळ



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १७ फेब्रुवारी-**
प्रख्यात कवयित्री, स्वातंत्र्यसैनिक व भारताची कोकिळा सरोजिनी नायडू यांच्या जयंतीदिनी साजऱ्या होणाऱ्या राष्ट्रीय महिला दिनानिमित्त, सावित्रीबाई फुले शिक्षण प्रसारक मंडळ संचलित एन. बी. नवले सिंहगड अभियांत्रिकी महाविद्यालयात विद्यार्थिनींसाठी स्वसंरक्षण प्रशिक्षण देण्यात आले.

द्वितीय वर्षातील सर्व विद्यार्थिनींसाठी स्वसंरक्षण प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. प्रशिक्षणासाठी महाविद्यालयाच्या माजी विद्यार्थिनी शिल्पा दासरी चन्ना यांना प्रमुख प्रशिक्षक म्हणून आमंत्रित करण्यात आले होते. त्यांच्यासोबत श्रावणी मोरे, अक्षरा जाधव, तृप्ती अलदार, ज्ञानेश्वरी मोरे आणि संस्कृती बटाणे या पाच प्रशिक्षकांनी विद्यार्थिनींना प्रत्यक्ष प्रात्यक्षिकांसह स्वसंरक्षणाच्या विविध तंत्रांचे मार्गदर्शन केले.

हा कार्यक्रम कॅम्पस डायरेक्टर संजय नवले यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडला. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. डी. नवले यांच्या हस्ते प्रमुख प्रशिक्षकांचा सत्कार करण्यात आला. विद्यार्थी कल्याण अधिष्ठाता डॉ. एस. एच. क्षीरसागर तसेच डॉ. के. सी. मुजावर यांनी कार्यक्रमाच्या आयोजनासाठी सहकार्य केले. महाविद्यालयाच्या लेडीज रिप्रेझेंटेटिव्ह तनुजा बिले व त्यांच्या समन्वयक वैष्णवी गायकवाड यांनी कार्यक्रमाचे समन्वयन केले. कार्यक्रमाचे समन्वयन प्रा. एम. डी. लटके यांनी केले.

## परीक्षेला आत्मविश्वासाने सामोरे जा, निश्चित यश मिळेल : डॉ. आडवीतोट

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. १७ फेब्रुवारी -**
सखोल अभ्यास, कठोर परिश्रम, जिद्द, चिकाटी, विषय आणि आशय समजून घेऊन मांडण्याचे कौशल्य यासोबतच आत्म विश्वासाची जोड असेल तर जीवनातील कोणत्याही परीक्षेत निश्चित यश मिळते, असे मत सी. बी. खेडगी महाविद्यालयाचे सेवानिवृत्त प्राचार्य डॉ. शिवराया आडवीतोट यांनी व्यक्त केले. बोरगाव दे. येथील विद्या विजय प्रशालेत इयत्ता दहावीच्या निरोप समारंभ कार्यक्रमात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी संस्थेचे सचिव तथा बोरगाव चे माजी सरपंच विलास सुरवसे हे होते. यावेळी व्यासपीठावर ज्येष्ठ संचालक आनंदप्पा कलशेट्टी, खजिनदार प्राध्यापक प्रकाश सुरवसे उपस्थित होते. प्रारंभी मुख्याध्यापक अरुण पाटील यांनी प्रास्ताविक केले. यावेळी दहावीच्या विद्यार्थ्यांना गुलाबपुष्प देऊन शुभेच्छा देण्यात आल्या. यावेळी विश्वनाथ हत्तरके, सुधीर बिराजदार, भाग्यकांत कल्याणी, अलिशा मकानदार, राजू हुक्कीरे, स्वामींनाथ स्वामी उपस्थित होते. सूत्रसंचालन मुशताक शेख यांनी केले तर गुरुशांत स्वामी यांनी आभार मानले.

## संभाजी आरमारचा गुरुवारी शाही पालखी सोहळा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १७ फेब्रुवारी-**
संभाजी आरमारच्यावतीने शिव जयंती मोठ्या थाटात साजरी केली जाते. यंदा देखील शिवरायांच्या ३९६ व्या जयंतीनिमित्त शाही पालखी सोहळा आयोजित केला आहे. पालखीतून छत्रपती शिवरायांची मिरवणूक काढली जाणार आहे.

पारंपरिक वाद्यांच्या गजरात छत्रपतींना साजेशा पद्धतीने हा दिमाखदार सोहळा साजरा होणार आहे. महाराष्ट्राची वैभवशाली परंपरा असणाऱ्या वारीमध्ये सादर होणारे सगळ्या अध्यात्मिक प्रकारांचे सादरीकरण केले जाणार आहे. पालखीमध्ये छत्रपती शिवरायांच्या मूर्तीसोबत भगवतगीता, तुकाराम गाथा, शिव चरित्र आणि भारतीय संविधानाची प्रत देखील असणार आहे. हलग्यांच्या आणि पारंपरिक वाद्यांच्या गजरात हजारो कार्यकर्ते मावळ्यांच्या वेशभूषेत आणि माता-भगिनी डोक्यावर भगवा फेटा परिधान करत सहभागी होणार आहेत. छत्रपती रंगभवन चौक येथे सकाळी १० वा. महापौर विनायक कोंड्याल, जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद आणि पोलीस आयुक्त एम. राजकुमार, छत्रपती शिवाजी महाराज रूग्णालयाचे अधिष्ठाता डॉ. ऋत्विक जयकर यांच्या उपस्थितीत सोहळ्याचा शुभारंभ होणार आहे. छत्रपती रंगभवन चौक - जिल्हा परिषद चौक -पंचकट्टा - पाणीवेस - दत्त चौक - सरस्वती चौक - मेकॅनिक चौक मार्गे छत्रपती शिवाजी महाराज चौक या मार्गावरून पालखी प्रस्थान होणार आहे. छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे मर्दानी खेळांचे सादरीकरण होणार आहे.

या अभिमानास्पद सोहळ्याचे साक्षीदार होण्यासाठी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन संभाजी आरमारचे संस्थापक अध्यक्ष श्रीकांत डांगे, कार्याध्यक्ष नगरसेवक शिवाजी वाघमोडे, पालखीप्रमुख अर्जुन शिवसिंगवाले, सहप्रमुख ॲड. रमाकांत बापट यांनी केले आहे.

# शिवरायांच्या पुतळ्यासाठी तम्मा शेळके ३० वर्षापासून अनवाणी

**शिवभक्तीचा अनोखा आदर्श; शिवरायाच्या पुतळ्यासाठी धडपडणारा मावळा**

**तभा वृत्तसेवा । नंदकुमार जगदाळे**
**अक्कलकोट, दि. १७ फेब्रुवारी-**



साथी हात बढाना एक, अकेला थक जाएगा मिलकर बोज उठाना या गाण्याची आठवण ध्येयवेडया नगरसेवक तम्मा शेळके यांच्याकडे पाहिल्यावर होते.



छत्रपती शिवरायांचा इतिहास सर्वांनाच प्रेरणादायी आहे आई भवानी मातेचा गजर करताच जय शिवरायची घोषणा ओठावर येतेच. अशा थोर युगपुरुष राजे छत्रपती शिवाजी राज्याचा प्रेरणादायी आश्वारुढ पुतळा ऐत्यासिक राजघराण्याचा इतिहास वारसा लाभलेल्या अक्कलकोट तीर्थक्षेत्री व्हावा ही महत्वाकांक्षा बाळगुन नगरसेवक तम्मा शेळके यांनी एक पण केला जोपर्यंत अश्वारुढ पुतळा उभा ठाकत नाही तोपर्यत अनवाणी फिरणार आज ३० वर्ष झाली ते अनवाणी फिरतात.

शिवजयंती उत्सव जवळ आला की, अक्कलकोटमध्ये विविध मंडळाकडून उत्साहाने शिवजयंती साजरी होती. शिवप्रेमी मंडळाकडून शासनकर्त्याकडून नगरपालिकेकडून शिवरायाचा पुतळा उभा राहण्याबाबत ठोस कृतीची अपेक्षा शिवभक्ताकडून जनसामान्याकडून व्यक्त होत आहे मात्र ध्येयवेडे तम्मा शेळके यांनी छत्रपती शिवरायाचा अश्वारूढ पुतळा उभा करण्याचा विडा उचलला आहे हे काम पूर्ण केल्या शिवाय पायात पादत्राणे घालणार नाही अशी प्रतिज्ञाच त्यांनी केली आहे.

छत्रपती शिवाजी महाराजांची प्रेरणा देणारा पुतळा सार्वजनिक ठिकाणी असायला हवा ही उणीव असलेली खंत दुर करावी, अशी तमाम शिवप्रेमीची मागणी आहे. ही शिवप्रेमीची मागणी पूर्ण करण्यासाठी शिवप्रेमी तम्मा शेळके १९९२ पासून एकाकी झटत आहेत सर्वप्रथम त्यांनी बसस्थानक परिसरातील चौकास छत्रपती शिवाजी महाराज चौक असे नामकरण करण्याचे निवेदन ३१ जाने १९९२ रोजी सहकारी शिवप्रेमी च्या मदतीने नगरपालिकेस दिले. ९ फेब्रुवारी १९९६ रोजी छत्रपती शिवाजी महाराज चौक असे नामकरण करण्याचा ठराव केला. चौकातील मध्यभागी संरक्षित जागी छत्रपती शिवरायाचां अश्वारूढ पुतळा बसविण्याची मागणी तम्मा शेळके यांनी नपाकडे केली. याकरिता शेळके यांनी छत्रपती शिवाजी महाराज बहुउद्देशीय समाजसेवी संस्थेची स्थापना केली. नगरपालिकाकडे पाठपुरवा केला. शासनाच्या परवानगीच्या अटीस अधीन राहुन नगर पालिकेने शिवाजी चौकातील संरक्षित जागेत छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा बसविण्या संदर्भात तम्मा शेळके यांच्या संस्थेस अनुमती देण्याचा ठराव सर्वानुमते घेण्यात आला. जिल्हाधिकारी यांच्याकडे परवानगीसाठी शेळके यांनी पाठपुरावा केला या अनुषंगाने विविध विभागाच्या परवानग्या ना हरकत प्रमाण पत्र संरक्षण संवर्धन जबाबदारी हमी अशा विविध प्रकारच्या परवानगी अटी पूर्तता करण्याचे काम नगरसेवक तम्मा शेळके यांनी केले आहे.

या कामाकरिता झटणारा सच्चा शिवप्रेमी मावळा ३१ जाने १९९२ पासून एकाकी झुंज देत आहे अक्कलकोटमधूनच नाहीतर संपूर्ण महाराष्ट्र नव्हे तर जगभरातून या कामाकरिता हात सरसावेत. आमदार सचिन कल्याणशेट्टी यांच्या मार्गदर्शनाखाली नगराध्यक्ष मिलन कल्याणशेट्टी यांच्या सहकार्याने लोकसहभागातून व लोकवाटयातून हे काम पूर्ण व्हावे, अशी भावना नगरसेवक तम्मा शेळके यांनी बोलताना व्यक्त केली.



### मायबोली सांस्कृतिक मंडळात राशी प्रेम कार्यक्रम

**बार्शी, दि. १७ फेब्रुवारी-**
येथील मायबोली सांस्कृतिक मंडळाच्यावतीने डॉ. विश्वास पटवर्धन यांच्या राशी प्रेम या कार्यक्रमाचे आयोजन नुकतेच करण्यात आले होते. त्यांच्यासोबत गफार मोमीन, ललिता जगदाळे आणि प्रज्ञा गौरकर हे गायक गायिका या कार्यक्रमात सहभागी झाले होते. डॉ. पटवर्धन यांनी सिंह राशीपासून सुरुवात करुन संपूर्ण बारा राशींची सफर घडवली. प्रत्येक राशीची वैशिष्ट्ये सांगताना त्यांनी त्या त्या राशीच्या स्वभावाच्या माणसांचे गमतीदार किस्सेही सांगितले. कार्यक्रमाचा प्रारंभी मायबोलीचे संस्थापक स्व.अध्यक्ष विजयकुमार माढेकर आणि संतश्रेष्ठ ज्ञानोबा माऊली यांच्या प्रतिमांचे पूजन करुन आणि दीपप्रज्वलन करुन झाला. अध्यक्ष मुकुंदराज कुलकर्णी यांनी प्रास्ताविक केले. सचिव डॉ. प्रशांत मोहिरे यांनी पाहुण्यांचा परिचय करुन दिला. याप्रसंगी उपाध्यक्ष जवाहर माढेकर यांनी पाहुण्यांना सन्मानित केले. आभार राजेंद्र श्रीश्रीमाळ यांनी मानले. सूत्रसंचालन डॉ. वैशाली मोहिरे आणि पल्लवी माढेकर यांनी केले. यावेळी व्यासपीठावर मायबोलीचे संचालक अरुण शहा, जितेंद्र माढेकर, सुनील आबा पाटील उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी व्यंकटेश कुलकर्णी, निलेश माढेकर, स्वामी, उमेश अक्कलकोटे, दिलीप मैंदरकर, धारुरकर यांनी परिश्रम घेतले.



### बार्शीतील शेतकऱ्यांना हेक्टरी ३० हजार रुपये पिक विमा मिळण्याची मागणी

**बार्शी, दि. १७ फेब्रुवारी-**
बार्शी तालुक्यातील शेतकऱ्यांना सन २०२५ वर्षातील खरीप हंगामातील पिकासाठी हेक्टरी ३० हजार रुपये पीक विमा मिळावा. अशा मागणीचे निवेदन तालुक्यातील शेतकऱ्यांनी जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी शुक्राचार्य भोसले यांना दिले आहे. तालुक्यात गेल्या वर्षीच्या तुलनेने चालू वर्षी सरासरीपेक्षा जास्त पाऊस झाला आहे. सन २०२५ मधील खरीप हंगामात अतिवृष्टी आणि सततच्या पावसाने सोयाबीन व इतर पिकाचे खूप मोठे नुकसान झाले होते. या पिकांच्या नुकसानीमुळे राज्य शासनाने खरीप पिकासाठी शेतकऱ्यांना अनुदान देखील देण्यात आले आहे. ज्या शेतकऱ्यांनी पिक विमा भरलेला आहे त्या शेतकऱ्यांना पिक विमा कंपनीकडून खरीप हंगाम २०२५ मधील सोयाबीन व इतर पिकासाठी हेक्टरी ३० हजार रुपये पिक विमा मिळावा, अशी मागणी जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी सोलापूर यांना राहुल भड, अशोक माळी, उमेश सुतार, संजय माळी, महेश भड आदी शेतकऱ्यांनी निवेदनाद्वारे केली आहे.




### मैत्र जीवांचे हे केवळ पुस्तक नसून मानवी नात्यांची ओवी : ज्येष्ठ साहित्यिका मेरु

**मंगळवेढा दि. १७ फेब्रुवारी-**
मैत्रीतील नानाविध भावनांचे संवेदनशील आणि भावपूर्ण चित्रण म्हणजे ‘मैत्र जीवांचे’ हे पुस्तक आहे. निखळ मैत्रीमुळे जीवनाची अवघड वाट सोपी होते आणि जगण्यातला निर्भेळ आनंद मिळतो, असे उद्गार ज्येष्ठ साहित्यिका वासंती मेरु यांनी काढले. महाराष्ट्र साहित्य परिषद, दामाजीनगर शाखेच्या वतीने आयोजित दया वाकडे यांच्या ‘मैत्र जीवांचे’ या पुस्तकाचा प्रकाशन सोहळा उत्साहात पार पडला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानावरून वासंती मेरु बोलत होत्या. कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलनाने झाली. म.सा.प. सोलापूर शाखेच्या अध्यक्षा डॉ. श्रुती वडगबाळकर आणि म.सा.प. दामाजीनगरचे अध्यक्ष प्रकाश जडे यांच्या हस्ते पुस्तकाचे प्रकाशन करण्यात आले. माजी नगराध्यक्षा अरुणा माळी यांनी म.सा.प. दामाजीनगर शाखा महिला लेखकांना व्यासपीठ मिळवून देत असल्याबद्दल समाधान व्यक्त केले. या सोहळ्याला नगराध्यक्षा सुनंदा आवताडे, अंजली आवताडे, प्रा. तेजस्विनी कदम, जयश्री कवचाळे, डॉ. श्रुती वडगबाळकर, प्रकाश जडे, कल्याण शिंदे, ॲड. नंदकुमार पवार, रामचंद्र वाकडे, सुखदेव मोरे, मारुती वाकडे, ड. रमेश जोशी, दामोदर देशमुख, डॉ. अतुल निकम, दिगंबर भगरे, भीमराव मोरे, लहू ढगे, रेश्मा गुंगे, रेखा जडे उपस्थित होते. प्रास्ताविक प्रा. विश्वनाथ ढेपे यांनी केले, तर आभार प्रा. डॉ. दत्ता सरगर यांनी मानले.

